# जाहीर आवाहन

लोकांनी गुंतवणूक केलेल्या रक्कमेवर जास्तीत जास्त व्याजाचे आमिष दाखवून किंवा काही वर्षात रक्कम दाम दुप्पट करुन देण्याच्या नावाखाली व्यक्ती, संस्था अथवा कंपन्या लोकांकडून ठेवी/रक्कम स्वीकारुन सदर गुंतवणूक-दारांना रक्कम गुंतविल्यानंतर सुरुवातीच्या काळात काही प्रमाणात परतावा देतात. त्यांनी दिलेला परतावा हा त्यांच्या योजनेप्रमाणे असल्यामुळे लोकांचा त्यावर विश्वास बसतो व इतरांनाही ते सदर योजनेमध्ये गुंतवणूक करण्यास प्रवृत्त करतात. त्यामुळे अशा प्रकारच्या गुंतवणूकीच्या योजनांमध्ये कमी दिवसात जास्तीत जास्त लोक पैसे गुंतवितात, तसेच साखळी पध्दतीच्या गुंतवणूक योजनांमुळे मूळ गुंतवणूकदारांचा मोठया प्रमाणावर फायदा होत असल्याने मूळ गुंतवणूकदारांकडून सदर योजनेचा मोठया प्रमाणावर जाहिरात केली जाते व त्यास बळी पडून अल्पावधीतच गुंतवणूकदारांची संख्या खुप मोठया प्रमाणावर वाढत आहे. त्यानंतर मात्र ठेव/रक्कम स्वीकारणाऱ्या व्यक्ती, संस्था अथवा कंपन्या आपली कार्यालये बंद करतात व लोकांची/गुंतवणूकदारांची फसवणूक करतात. राज्यात अशा प्रकारच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असून ठेव/रक्कम स्वीकारणाऱ्या व्यक्ती, संस्था अथवा कंपन्या यांच्या आमिषाला बळी पडून अशा प्रकारच्या बऱ्याच कंपन्यांकडून जास्त रक्कम मिळविण्याच्या लालसेपोटी लोकांची फसवणूक झाल्याचे निदर्शनास आले आहे.

महाराष्ट्रातील ठेवीदारांची/गुंतवणूकदारांची त्यांनी गुंतवणूक केलेल्या संस्थेद्वारे फसवणूक होत असल्याची प्रकरणे वारंवार घडत आल्याने महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम २९ एप्रिल, १९९९ रोजी अंमलात आणला आहे.

गुंतवणूक केलेल्या रक्कमेवर जास्तीत जास्त व्याजाचे आमिषाने किंवा काही वर्षात रक्कम दाम दुप्पट करुन देण्याच्या आमिषाला लोकांनी बळी पडू नये तसेच गुंतवणूक केलेल्या रक्कमेवर जास्तीत जास्त व्याज देणाऱ्या गुंतवणूक योजनांविषयी सखोल माहिती करुन घ्यावी व अशा बोगस योजनांपासून सावधान रहावे. अशा प्रकारच्या गुंतवणूक योजना राबविणाऱ्या कंपन्यामार्फत कोणाची फसवणूक झाली असेल तर त्यांनी तत्काळ स्थानिक पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करावी असे सर्व नागरिकांना शासनामार्फत आवाहन करण्यात येत आहे.

*-*-*-*-*-*-*-*-*-*-*-*-*-*-*-*-*-*-*